# ३११ सीसीटीव्ही, ३०० स्वयंसेवक, मोफत अन्नदान

## सुरक्षा-सुविधांचे कडक नियोजन

(समर्थ गांवकरी)

साडेतीन शक्तिपीठांपैकी आद्य स्वयंभू असलेल्या श्री क्षेत्र सप्तशृंगगडावर होणाऱ्या चैत्रोत्सव यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कंबर कसली असून यात्रेच्या नियोजनासाठी महत्त्वाची नियोजन बैठक पार पडली. श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या चिंतन हॉलमध्ये सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कळवण डॉ. कश्मिरा संखे (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. दि. २६ मार्च ते २ एप्रिल २०२६ दरम्यान होणाऱ्या चैत्रोत्सव यात्रेत लाखो भाविक गडावर दाखल होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था, सुरक्षा, स्वच्छता, वाहतूक आणि आरोग्य सुविधांचे काटेकोर नियोजन करण्यात आले. यात्रेच्या काळात भाविकांच्या सोयीसाठी शिवालय परिसरात नेहमीप्रमाणे मोठ्या मंडपाची व्यवस्था विश्वात संस्थेच्या वतीने नेहमीप्रमाणे करण्यात येणार असून मोबाईल टॉयलेट, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि स्वच्छतेसाठी विशेष कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.

आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सुमारे १०० कर्मचारी सज्ज ठेवण्यात येणार आहेत. तसेच अनिरुद्ध अकॅडमीचे जवळपास २०० स्वयंसेवकही यात्रेच्या व्यवस्थापनासाठी कार्यरत राहणार आहेत. मंदिर परिसरात सुरक्षेसाठी तब्बल ३११ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत ठेवण्यात येणार असून संपूर्ण परिसरावर नियंत्रण ठेवले जाणार आहे. यात्रेदरम्यान श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी मोफत अन्नदानाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच सप्तशृंग गड परिसरात व विविध मार्गांवर पिण्याच्या पाण्याची ठिकठिकाणी व्यवस्था करण्यात येणार आहे. वाहतूक व्यवस्थेसाठी एसटी महामंडळाकडून विशेष ३०० जादा बसचे नियोजन करण्यात येणार असून घाटमार्गात आणि सप्तशृंग गडावर अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.



सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस प्रशासनाकडून उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक तसेच मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. गर्दी नियंत्रणासाठी बॅरिकेडिंगची व्यवस्था, ट्रस्टच्या वतीने सिजफायर (आपत्कालीन नियंत्रण) यंत्रणा तसेच अग्निशमन दलाची गाडीही सतत सज्ज ठेवण्यात येणार आहे. या बैठकीस विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कळवण तहसिलदार रोहिदास वारुळे, श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त ॲड ललित निकम कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, इस्टेट अधिकारी प्रकाश पगार, सुरक्षा अधिकारी यशवंत देशमुख, प्रसादालय विभाग प्रमुख नारद आहिरे, नानाजी भामरे, प्रशांत निकम, विजय भवरे, किरण राजपूत, सुनील कासार, पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत सप्तशृंगगडचे सरपंच रमेश पवार, उपसरपंच संदीप बेनके, ग्रामसेवक संजय देवरे, सदस्य राजेश गवळी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अजय दुबे, आदी विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यात्रेच्या तयारी सुरू असल्याने यंदाचा चैत्रोत्सव सुरळीत व सुरक्षित पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यात्रेच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वय ठेवून काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# आदिवासी भागात शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या मंजुषा काळे यांना राज्यस्तरीय 'ऋणानुबंध' पुरस्कार जाहीर!

अकोले : (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात गेली ३३ वर्षे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मंजुषा काळे यांना 'ऋणानुबंध' बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

अहिल्यानगर येथील 'ऋणानुबंध' बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात येणार असून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. ७ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

आदिवासी भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मंजुषा काळे यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ सातत्याने कार्य केले आहे. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अजित रोकडे यांनी दिली.




या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला व्यापक पातळीवर दाद मिळणार असून शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, हा पुरस्कार श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक आणि ज्या राजुर व मवेशी गावांमध्ये सेवा करण्याची संधी मिळाली त्या सर्वांना समर्पित असल्याची भावना मंजुषा काळे यांनी व्यक्त केली.

# मोफत मोतीबिंदू व लेन्स शस्त्रक्रिया शिबिरात २५ पैकी २२ नागरिकांच्या शस्त्रक्रिया यशस्वी!

पुणे : (समर्थ गांवकरी)

समाजसेवेच्या उद्देशाने माय माऊली केअर सेंटर, समता फाउंडेशन मुंबई आणि एच. व्ही. देसाई हॉस्पिटल, मोहम्मद वाडी (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू व लेन्स शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात २५ नागरिकांची तपासणी करून त्यापैकी २२ नागरिकांच्या मोतीबिंदू व लेन्स शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या. दि. ८ मार्च २०२६ रोजी आयोजित या उपक्रमांतर्गत कात्रज, धनकवडी, पद्मावती, कोंढवा, खेड शिवापूर, राजगुरुनगर, हडपसर, बिबवेवाडी तसेच पुणे परिसरातील २५ गरजू नागरिकांना माय माऊली केअर सेंटर, कात्रज येथून एच. व्ही. देसाई हॉस्पिटल, मोहम्मद वाडी येथे नेण्यात आले. तेथे त्यांची मोफत तपासणी व शस्त्रक्रिया करण्यात आली.




शस्त्रक्रियेनंतर सर्व नागरिकांना पुन्हा माय माऊली केअर सेंटर येथे सुरक्षितपणे आणण्यात आले. त्यापैकी २२ नागरिकांच्या शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर त्यांना नातेवाईकांसह घरी पाठविण्यात आले. या उपक्रमावेळी ला. विशाल वरुडे पाटील, ला. अश्विनी वरुडे पाटील तसेच माय माऊली केअर सेंटर व लायन्स क्लब ऑफ पुणे कात्रजचे संस्थापक-अध्यक्ष ला. विठ्ठलराव वरुडे पाटील उपस्थित होते. समाजसेवा हीच आमची ओळख असून वृद्ध व अंथरुणाला खिळलेल्या आजी-आजोबांची सेवा करण्याचे कार्य माय माऊली केअर सेंटरच्या माध्यमातून सातत्याने केले जात असल्याचे विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी सांगितले. तसेच या उपक्रमाची माहिती अधिकाधिक गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# अनुजा कांबळे यांचा सन्मान

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

जागतिक महिला दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये अनुजा कांबळे यांचा पद्मश्री बिजमाता राहीबाई पोपेरे यांची हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. याबाबत बोलताना अनुजा कांबळे म्हणाल्या मी काम केलेली मराठी फिल्म " मदार " हीला फीप,पुणे फिल्म फेस्टिवल चे पाच पुरस्कार मिळाले. आणि महाराष्ट्र शासनाचा 15 लाख रुपयांचा पुरस्कार मिळाला तसेच आमची फिल्म कांस फेस्टिवल साठी महाराष्ट्र शासनाने पाठवली. याबद्दल व माझ्या इतर सामाजिक कार्याबद्दल व राबविलेल्या उपक्रमाबद्दल माझी दखल घेण्यात आली त्यासाठी मी सर्वांचीच व खास करून नगरसेविका आशाताई डागवाले यांची खास आभारी आहे.

# परेश सोनावणे यांना भिवंडी "तालुका आदर्श ग्रामपंचायत अधिकारी" पुरस्कार जाहीर

भिवंडी : (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद ठाणे मार्फत यावर्षी ग्रामपंचायत अधिकारी संवर्गातील सन- २०१५ ते २०१६, सन २०१६ ते २०१७, सन २०१७ ते २०१८, सन २०१८ ते २०१९ तसेंच सन २०१९ ते २०२०. सन २०२० ते २०२१. सन २०२१ ते २०२२. सन २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षामध्ये उत्कृष्ट काम करणा-या ग्रामपंचायत अधिकारी यांची आदर्श ग्रामसेवक म्हणुन निवड करण्यात आलेली आहे,ह्या पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत अधिकारी ह्यामध्ये भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे ग्रामपंचायत मध्ये कार्यरत विद्यमान ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांना भिवंडी"तालुका आदर्श ग्रामपंचायत अधिकारी" पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदरचा पुरस्कार अतिशय कर्तृत्ववान आणि कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी यांना दिला गेल्याने सर्व




भिवंडी परिसर व इतर तालुक्यातून कौतुक केले जात आहे.मुळात सदर ग्रामपंचायत अधिकारी ह्यांनी जिथून डोहोळे ग्रामपंचायत चा कार्यभार सांभाळला आहे तिथून त्यांच जे काही काम सुरु आहे त्याबाबत ग्रामपंचायत डोहोळे हद्दीतीलच नाही तर परिसरातील इतर सर्व ग्रामपंचायत मधील नागरिक हे सुद्धा कौतुक करताना दिसुन येत आहे आणि हिच खऱ्या अर्थाने कामाची पोहच पावती समजली जात आहे. आर आर (आबा )पाटील सुंदर गाव तालुका आणि जिल्हा सुंदर गाव पुरस्कार ग्रामपंचायत डोहोळे ला त्यांनी मिळवून दिले आहे. तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ गाव स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम पुरस्कार मिळवून दिला आहे. त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती मिळताच विविध स्तरावर त्यांच्यावर अभिनंदनच वर्षा होत आहे. नुकत्याच झालेल्या"मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान" कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे उपस्थित राहून पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांची कामाची स्तुती त्यांनी आपल्या मनोगतातून केली होती. मला" तालुका आदर्श ग्रामपंचायत अधिकारी"पुरस्कार घोषित झाला.आज माझी "आजी" असती तर तिचं कौतुक गगनात मावेनासं झालं असतं.आजचा हा पुरस्कार तिलाच अर्पण,अशी प्रतिक्रिया पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी दिली.

# विज्ञान-तंत्रज्ञान मानवाच्या भविष्याला आकार देत आहे

- डॉ. रानिया लॅम्पू : जल व अवकाशनंतर पुढील वर्षी 'अग्री' विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद – डॉ. विजय जाधव

भिवंडी : (समर्थ गांवकरी)

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या बी.एन.एन. कॉलेज भिवंडी येथे नुकतीच "SPACE : Ace, Place, Pace" या विषयावर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय आंतरशाखीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेला देश-विदेशातील संशोधक, प्राध्यापक, अभ्यासक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

परिषदेत ग्रीस सरकारच्या शिक्षण मंत्रालयातील ग्लोबल अकॅडमीशियन डॉ. रानिया लॅम्पू यांनी विज्ञान आणि समाजजीवन याविषयी मार्गदर्शन करताना सांगितले की, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित, खगोलशास्त्र व भौतिकशास्त्र या क्षेत्रातील प्रगतीमुळे मानवाच्या भविष्याला नवे आकार मिळत आहेत. अंतराळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दळणवळण आणि संदेशवहन क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. 'शक्ती सॅट' उपग्रहामुळे महिला सक्षमीकरणालाही मोठी



चालना मिळत असून या उपग्रह प्रकल्पासाठी १०८ देश एकत्रितपणे काम करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

शाश्वत विकास आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांवरही त्यांनी विचार मांडले. परिषदेत विविध विषयांवर संशोधनपर लेख सादर करण्यात आले. सुमारे ४०० पेक्षा अधिक संशोधन निबंधांची नोंदणी झाली होती.


त्यापैकी ३२५ संशोधन निबंधांचे प्रत्यक्ष सादरीकरण विविध तांत्रिक सत्रांमध्ये करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय पांडुरंग जाधव यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, पंचमहाभूतांवर आधारित आंतरराष्ट्रीय परिषदेचे हे दुसरे वर्ष आहे. मागील वर्षी 'जल', यावर्षी 'अवकाश', तर पुढील वर्षी 'अग्री' या विषयावर परिषद आयोजित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अवकाश विषयाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनीही परिषदेतून अनेक नवे विचार आणि ज्ञान मिळाल्याचे सांगितले. मुंबई विद्यापीठ वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. किन्नरी ठक्कर यांनी आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाणिज्य, व्यापार व व्यवहार क्षेत्रात मोठे बदल घडत असल्याचे नमूद केले. आयसीटी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. आर. देशमुख यांनी भारतीय अवकाश संशोधनात इस्रो ची भूमिका स्पष्ट करत चांद्रयान-३ मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाचा उल्लेख केला. तसेच भारताने जगाला आर्यभट्ट यांसारखे महान संशोधक दिल्याचेही त्यांनी सांगितले. समारोप सत्रात डॉ. संतोष राठोड यांनी 'अवकाश' या संकल्पनेच्या विविध व्याख्या सांगत प्रगत तंत्रज्ञानाच्या दिशेने जगाची वाटचाल कशी होत आहे, यावर भाष्य केले. सुरुवातीला आयक्यूएसी समन्वयक डॉ. कुलदीप सिंह राठोड यांनी पंचमहाभूतांचे आणि अवकाशाचे मानवी आयुष्यातील महत्त्व स्पष्ट केले. स्वागतपर भाषणात प्रभारी प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर यांनी 'स्पेस' ही केवळ जागा नसून विविध दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासारखी व्यापक संकल्पना असल्याचे सांगितले.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. निनाद जाधव लिखित 'ग्रामीण पायाभूत सुविधा आणि विकास' या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील डॉ. विकास उबाळे, डॉ. रमेश घोगरे आणि डॉ. सागर सानप यांना पीएच.डी. मार्गदर्शकपद प्राप्त झाल्याबद्दल तर डॉ. रसिका घरत व डॉ. विना धसाडे-सानप यांनी पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

परिषदेचे उद्घाटन अध्यक्ष डॉ. विजय जाधव व कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनी रोपट्याला पाणी घालून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अनोख्या पद्धतीने केले.

# दिवा खर्डी फेस्टिव्हल जत्रेत चोरांचा सुळसुळाट



ठाणे : (समर्थ गांवकरी)

दिवा खर्डी येथील नुकत्याच सुरु झालेल्या मेल्यात चोरांचा सुळसुळाट पहावयास मिळत आहे. दिव्यातील खर्डी येथील सायंकाळच्या वेळेस गर्दीत भरणारा मेला पहावयास आपल्या मुलांबरोबर पालकांची देखील गर्दी होत आहे. याचाच फायदा घेत काल रात्रीच्या सुमारास वकील रविराज बोटले यांच्या मुलीच्या गळ्यातून भर जत्रे मधून सोन्याचे लॉकेट चोरी झाले आहे. त्या संदर्भात त्यांनी शीळ डायघर पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दिव्यातील बेकायदेशीर बाजार, जत्रा, मेळा भरत असून अशी काही ठिकाणे चोरट्यानी हेरून घेतली असून अनेकांच्या मौल्यवान वस्तू व दागिने लंपास करत आहे त्यामुळे दिवसेंदिवस मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीस चौकीत व डायघर पोलीस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणावर चोरीच्या घटनेत वाढ होत आहे. ऍड. रविराज बोटले यांची आई व पत्नी मुलीला घेऊन जाताना दिवा शीळ रोडवर पटेल मार्टच्या बाजूला लागलेल्या दिवा फेस्टिव्हल या जत्रेत मुलीच्या हट्टपायी गेलो असताना तेथेच हा चोरीचा प्रकार झाल्याने ऍड. रविराज बोटले यांनी डायघर पोलीस स्टेशनं मध्ये जाऊन रीतसर तक्रार देत अज्ञात चोराविरोधात भारतीय न्याय सहिंता नुसार कलम 303 नुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश शिरसकर करत आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३२/२०२६ अकोले दि. ०६/०३/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. काशिनाथ बबन मधे, रा. पिंपळदरी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा मुलगा कु. देवांश काशिनाथ मधे याचा जन्म दि. ०५/०९/२०२० रोजी पिंपळदरी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **पिंपळदरी**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. काशिनाथ बबन मधे, रा. पिंपळदरी**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा मुलगा कु. देवांश काशिनाथ मधे याचा जन्म दि. ०५/०९/२०२० रोजी पिंपळदरी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **पिंपळदरी**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०६/०३/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३१/२०२६ अकोले दि.०६/०३/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. रेहाना सलीम शेख, रा.घोडसरवाडी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांची मुलगी कु. खुशबु सलीम शेख याचा जन्म दि. १६/११/२०१२ रोजी घोडसरवाडी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **घोडसरवाडी**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. रेहाना सलीम शेख, रा.घोडसरवाडी**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी कु. खुशबु सलीम शेख याचा जन्म दि. १६/११/२०१२ रोजी घोडसरवाडी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **घोडसरवाडी**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०६/०३/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# भाजपच्या युवा नेत्याकडून हृदयविकार रुग्णाला तातडीची मदत

## अखिलेश पाल यांचे कुटुंबीयांकडून आभार

ठाणे : (समर्थ गांवकरी)

हार्टअटॅकग्रस्त रुग्णाला भाजपचे युवा नेते अखिलेश पाल यांच्या सतर्कतेमुळे वेळेवर उपचार मिळाले. कल्याण येथील रहिवासी बापू सुखदेव जाधव यांना अचानक हार्टअटॅक आल्याने तातडीने उपचारांची गरज निर्माण झाली होती. मात्र कल्याण शहरात रुग्णालयात बेड मिळत नसल्याने रुग्णाला तातडीने उपचार



मिळवणे कठीण झाले होते. इतर रुग्णालयांमध्ये उपचारासाठी ४–५ लाख रुपये खर्च येत असल्याने

"समाजातील एखाद्या व्यक्तीला अडचणीत असताना मदत करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. आरोग्याशी संबंधित अडचणींमध्ये शक्य ती मदत करण्याचा माझा कायम प्रयत्न असतो." **- अखिलेश पाल**

कुटुंबीयांना अडचण निर्माण झाली होती. प्रसंगी मनोरमानगर, ठाणे येथील समाजसेवक निखिल शिंदे आणि राकेश निकम यांनी भाजपचे युवा नेते अखिलेश पाल यांच्याशी संपर्क साधला. पाल यांनी तातडीने डॉक्टरांशी समन्वय साधत रुग्णाला कलवा येथील धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर सेंटरमध्ये दाखल केले. येथे डॉक्टरांनी त्वरित शस्त्रक्रिया करून रुग्णावर आवश्यक उपचार केले व सर्व उपचार मोफत करण्यात आले असून, रुग्णाची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे व त्याला डिस्चार्ज देण्यात आला आहे. या मदतीमुळे रुग्णाच्या कुटुंबीयांनी अखिलेश पाल यांचे मनापासून आभार मानले.

## ग्रामपंचायत शिरोली तर्फे आळे, ता. जुन्नर, जि. पुणे

ग्रामपंचायत शिरोली तर्फे आळे, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे तर्फे जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पंजीकरण / नोंदणीकृत ठेकेदारांकडून केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांचकडून दोन लिफाफ्यात खालील कामांच्या निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत यांचकडून दि. ११/०३/२०२६ ते १८/०३/२०२६ पर्यंत स्विकारल्या जातील. दि. २०/०३/२०२६ रोजी निविदा उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत | निविदा प्रसिध्दी दि. | लेखाशिर्ष | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे शिरोली तर्फे आळे गावठाण अंडरग्राउंड गटर तयार करणे. | ३०८९६२/- | -//- | २९०/- | ३ महिने | ११/०३/२६ | १५ वा वित्त आयोग | सु.बे.अ., १ ते ७ वर्ग |
| २ | मौजे शिरोली तर्फे आळे गावठाण अंतर्गत अंडर ग्राउंड गटर बांधणे. | ९९३०९/- | -//- | ११८/- | ३ महिने | ११/०३/२६ | १५ वा वित्त आयोग | सु.बे.अ., १ ते ७ वर्ग |

टिप : कोणत्याही निविदा /दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा, काम रद्द करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवले आहे. वरील कामाबाबत नियम, अटी व शर्ती व इतर सर्व सविस्तर माहिती **ग्रामपंचायत कार्यालय शिरोली तर्फे आळे ता. जुन्नर जि. पुणे** यांच्या नोटीस बोर्डवर पाहण्यास मिळेल.

**सरपंच**
**ग्रामपंचायत शिरोली तर्फे आळे ता. जुन्नर जि. पुणे**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत शिरोली तर्फे आळे ता. जुन्नर जि. पुणे**